दैनिक लोकपरिवर्तन
निर्भिड निष्पक्ष आवाज जनतेचा
संपादक - आबासाहेब शिरसाठ
शनिवार दिनांक १७/८/२०२४ उपसंपादक पोपटराव सोनवने कार्यकारी उपसंपादक भारत भालेराव

# स्वराज्य महिला प्रभाग संघ- राजुरीच्या वार्षिक मेळाव्यात १५०० महिलांना क्विक हिल फाउंडेशन यांच्यावतीने दिले सायबर सुरक्षेचे धडे




**दै.लोकपरिवर्तन** आळेफाटा प्रतिनिधी ( नुतन / बुधवार दिनांक ७ रोजी स्वराज्य महिला प्रभाग संघ राजुरी- बेल्हे यांच्या वार्षिक सर्वसाधारण सभेचे आयोजन स्वामी कृपा लॉन्स,बेल्हे गुंजाळवाडी येथे करण्यात आले होते.याप्रसंगी १५०० ते २००० महिला कार्यकर्त्या उपस्थित होत्या,या सर्व महिला कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात बी.जे. महाविद्यालय व क्विक हिल फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असलेल्या "सायबर शिक्षा फॉर सायबर सुरक्षा" या प्रकल्पांतर्गत महाविद्यालयातील निवड झालेले ३० सायबर वॉरियर्सने सायबर सुरक्षे विषयक माहिती दिली व सायबर सुरक्षित राहण्यासाठी उपाययोजनांची अंमलबजावणी कशी करायची हे देखील सांगितले.विद्यार्थांनी याप्रसंगी उपस्थित महिलांना सायबर सुरक्षा माहिती पुस्तिका डाऊनलोड देखील करून दिली व सर्व महिलांना सामूहिक सायबर सुरक्षेची शपथ दिली.

फायनान्शिअल फ्रॉड याबाबत अक्षदा हाडवळे,वरद वाघ,मिसबाह ईनामदार व रोहन टाकळकर आणि व्हॉलिंटर्स च्या टीमने एक नाटक सादर केले ज्यामधून सायबर सुरक्षेचा एक सामाजिक संदेश देण्यात आला.

मा.श्री.पांडुरंग पवार साहेब(मा. उपाध्यक्ष जि.प. पुणे)यांच्या उपस्थितीत हा कार्यक्रम घेण्यात आला.सदर कार्यक्रमानंतर उपस्थित मान्यवर व आयोजकांनी विद्यार्थ्यांचे व बी.जे. महाविद्यालयाचे आणि क्विक हिल फाउंडेशनचे या उपक्रमासाठी विशेष कौतुक केले.

या संस्थेचे अध्यक्ष अजयनाना कुऱ्हाडे बाळासाहेब जाधव, उपाध्यक्ष सौरभ डोके, मानद सचिव अर्जुनशेठ पाडेकर, खजिनदार अरुणशेठ हुलवळे तसेच संचालक किशोरशेठ कु-हाडे,भाउशेठ कु-हाडे, बबन सहाणे उल्हासशेठ सहाणे, बाबुशेठ कुऱ्हाडे, शिवाजी गुंजाळ , जीवनशेठ शिंदे, दिनेश सहाणे, कैलासशेठ शेळके प्रदिपशेठ गुंजाळ, देविदास पाडेकर, सम्राट कुऱ्हाडे, रमेश कुऱ्हाडे, शांताराम कुऱ्हाडे व सर्व संचालक मंडळ यांनी हार्दिक शुभेच्छा दिल्या तर कार्यक्रमाचे आयोजन प्राचार्य डॉ. प्रवीण जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली विभाग प्रमुख नूतन जोशी व सर्व सहकारी प्राध्यापकांनी केले. सुत्रसंचलन अश्विनी हाडवळे यांनी तर आभारप्रदर्शन हेमलता शिंदे यांनी केले•